T-1-1733
30/6/11

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
Email : info@sra.gov.in

क्र.झोपुप्रा/वित्त/कार्या-१/टे/एफ-३/२०११/13 e५
दिनांक 28 JUN 2011

**परिपत्रक क्र. :- १२८**

विषय:- विकासकाकडुन प्राधिकरणाचे येणे रकमांची पडताळणी लेखा शाखेकडुन घेणेबाबत.

अभियांत्रिकी शाखेकडुन सहकारी सोसायटींच्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित केले जाते. भोगवटा प्रमाणपत्र दिलेल्या संस्थांना त्याजाती प्रदान करतांना असे निदर्शनास आले की, विकासकाने संबंधित संस्थेच्या वतीने चलनाने एकत्रितपणे देखभाल व दुरुस्ती, पायाभुत सुविधा, एम.आर.टी.पी. व एल.ओ.आय., प्रस्ताव तपासणी, स्टेअरकेस प्रिमियम इ. फि च्या रक्कमा भरल्या जातात. त्यात भोगवटा प्रमाणपत्रात सहकारी संस्थाची सभासद संख्या नमुद केलेली नसते. तसेच एस.आर.डीमधुन एस.आर.ए. मध्ये रुपांतरीत योजनांचे नियमाप्रमाणे देखभाल निधी विकासकाकडुन जमा केल्याची खातरजमा केली जात नसल्याने संस्थांना व्याज अदाई व मुदत ठेव करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे वेळेत व्याज अदाई व मुदत ठेव केली जात नसल्याने संस्थामध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे.

भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यापुर्वी विकासकाकडुन सर्व रकमांचा भरणा केला जातो मात्र त्याची आर्थिक दृष्टीकोनातुन तपासणी केली जात नाही. भविष्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी रकमांची परिगणना

C:\Documents and Settings\ADMIN\Desktop\RTI\Circular.doc

नियमाप्रमाणे करुन त्ती विहीत कालावधीत विहीत लेखाशिर्षाखाली भरणा केली किंवा नाही विलंबाने भरल्या असतील किंवा भरणा सवलत दिली असल्यास व्याज आकारणी, व्याज वसुली या सर्व बाबीची लेखा विभागामार्फत तपासणी होणे गरजेचे वाटते.

या संदर्भात दिनांक ९.०५.२०११ रोजीच्या खाते प्रमुखांचे बैठकीत चर्चा झाली. तरी यापुढे अभियांत्रिकी विभागाने वेगवेगळया रकमांचे वेगळे चलान तयार करुन रकमा विहीत लेखाशिर्षाखाली भराव्यात व भोगवठा प्रमाणपत्र निर्गमित करण्यापुर्वी सर्व लेखाविषयक बाबीची लेखा विभागाकडुन तपासनी करुन घ्यावी या कार्यपध्दतीमुळे प्राधिकरणामध्ये आर्थिकशिस्त येवुन भोगवठा प्रमाणपत्र निर्गमित झाल्याबरोबर संस्थाची मुदत ठेव करता येवु शकेल व संस्थाना व्याज अदा करण्याची गरज भासणार नाही. ही कार्यपध्दती दिनांक १.०६.२०११ पासुन अमंलात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत
1) उपसचिव अभियंता / सोधु[illegible]

C:\Documents and Settings\ADMIN\Desktop\RTI\Circular.doc

315